पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८

नगररचना व विकास विभाग

मुख्य कार्यालय

मुख्य प्रशासकीय इमारत,तळमजला, पिंपरी-४११०१८

## मानधनावर नेमणूक करणेबाबत

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेच्या नगररचना व विकास विभागाकडील भूसंपादन प्रकरणांचा वाढता व्याप व म.न.पा. क्षेत्रातील प्रचंड वेगाने वाढणारे नागरीकरण विचारात घेता, मंजूर विकास योजनेतील आरक्षणे व मनपा सभेने मान्यता दिलेली आरक्षणे जलद गतीने ताब्यात घेणेकामी भूसंपादन अधिकारी तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाशी समन्वय साधणेसाठी महानगरपालिकेस निवृत्त उप जिल्हाधिकारी यांची खालील पदावर १ वर्ष कालावधीसाठी मानधनावर नेमणूक करावयाची असून त्याबाबत शैक्षणिक अर्हता व अटी, शर्ती खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | एकत्रीत मानधन | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| १. | समन्वयक भूसंपादन अधिकारी | १ | ३५,०००/- | कोणत्याही शाखेची पदवी | भूसंपादन अधिकारी या पदाचा ५ वर्षाचा अनुभव तसेच पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात काम केलेले असल्यास प्राधान्य. |

अटी व शर्ती

१) मानधनावरील नेमणूक पुर्णपणे तात्पुरत्या १ वर्ष कालावधीसाठी (हंगामी) स्वरूपाची आहे.

२) अर्जदारास कोणत्याही प्रसंगी कायम नेमणूकीचा हक्क प्राप्त होणार नाही.

३) ज्या दिवशी मनपास सदर पदाची आवश्यकता नसेल त्यावेळी त्यांची मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येईल.

४) उमेदवाराचे वय ७० पेक्षा जास्त नसावे.

५) उपरोक्त पदासाठी वर नमूद केलेनुसार मानधन देय राहील.

६) सदर पदावर नेमणूक झालेस र.रू. १००/- चे स्टॅम्प पेपरवर हमीपत्र देणे बंधनकारक राहील.

तरी इच्छुक उमेदवारांनी दिनांक १७/०६/२०१९ अखेरपर्यंत आपले अर्ज वरील पत्यावर पाठविणे आवश्यक आहे. अर्जासोबत स्वत:चे अलीकडे काढलेले दोन रंगीत फोटो जोडावेत तसेच लिफाफ्यावर संबंधित पदासाठी अर्ज असे नमूद करावे. अर्जासोबत शैक्षणिक अर्हते बाबत तसेच अनुभव प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. पात्र उमेदवाराची मुलाखत पत्र अलाहिदा त्यांचे अर्जात नमुद केलेल्या पत्त्यावर पाठविण्यात येतील.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

जाहिरात क्रमांक ३९६

क्र नरवि/कावि/आ २/ ७४८ /२०१९